मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १५५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### कॉपीमुक्त अभियानासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या कडक निर्देश

## कॉपी करण्यास सहकार्य करणाऱ्यावर गुन्हा दाखल करुन सेवेतून निलंबित करणार





**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (बारावी) दि.१० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (दहावी) दि.२० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यात इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी ३७ हजार ३३८ विद्यार्थ्यांसाठी ७९ परीक्षा केंद्र आहेत. इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी ३२ हजार ४३३ विद्यार्थ्यांसाठी १०२ परीक्षा केंद्र आहेत. सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची चोख व्यवस्था करण्यात आली असून जिल्ह्यातील संवेदनशील बारावीच्या ८ तर दहावीच्या ४ अशा एकुण १२ परीक्षा केंद्रावर ड्रोन कॅमेऱ्याची नजर राहणार असून चित्रीकरणही करण्यात येणार आहे. जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार असून दहावी, बारावीच्या परीक्षेत कॉपी करण्यास सहकार्य करणाऱ्यावर गुन्हा दाखल करुन सेवेतून निलंबित केले जाईल, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात दहावी, बारावीच्या परीक्षेच्या अनुषंगाने दक्षता समितीची बैठक पार पडली. यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीस उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, पोलिस उपअधिक्षक रविंद्र निकाळजे, शिक्षणाधिकारी बाळु खरात यांच्यासह शिक्षण विभागासह संबंधित यंत्रणेचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, विद्यार्थ्यांची क्षमता विकसित करण्यासाठी कॉपीला आळा घालणे अतिशय महत्वाचे आहे. दहावी, बारावीच्या परीक्षा शांततेत व तणावमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी वातावरण निमिर्ती करुन विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढ होण्यासाठी कॉपीमुक्त परीक्षा अत्यंत महत्वाची आहे. आगामी काळात परीक्षा पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्याचा प्रशासनाचा मानस असून कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाकडून कडक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. दहावी व बारावीच्या परीक्षेत कॉपी करण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवारावर कठोर कारवाई करण्यात येईल. परीक्षार्थ्यांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये, आपल्या अभ्यासावरुन पेपरमध्ये लिखाण करावे. सर्व परीक्षा केंद्रावर २ अधिकारी-कर्मचाऱ्यांची बैठे पथकात नियुक्ती करण्यात येणार आहे. जिल्हाभरात परीक्षेसाठी एकुण ६ भरारी पथके तैनात करण्यात आली असून त्याद्वारे सर्व परीक्षा केंद्रावर लक्ष दिले जाणार आहे. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी केंद्र संचालकांनी दक्षता बाळगावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. केंद्र संचालकाशिवाय परीक्षा केंद्रावर कोणत्याही व्यक्तीला मोबाईलचा वापर करता येणार नाही. तसेच परीक्षा केंद्र परीसरात १४४ कलम लागू करण्यात येणार आहे. परीक्षार्थ्यांची तपासणी करुन नंतरच परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येणार आहे. जालना जिल्ह्यातील दहावी, बारावीच्या एकुण १२ संवेदनशिल परीक्षा केंद्रासाठी वेगळ्या मार्गदर्शक सूचना देण्यात येणार असून त्यांच्यासाठी स्वतंत्र व्हॉटसअप ग्रुपही तयार करण्यात आला आहे. त्याद्वारे नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. या सर्व दहावी, बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या टॉप टेन केंद्र प्रमुखांचा पालकमंत्री यांच्या हस्ते गौरव केला जाईल. असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी उपस्थित केंद्र प्रमुखांना माझ्या परीक्षा केंद्रावर कॉपीचा गैरप्रकार घडू देणार नाही अशी सामुहिक प्रतिज्ञा देण्यात आली. या बैठकीस जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, सर्व केंद्र संचालक आदि उपस्थित होते.

## संभाजीनगर पाटील गल्ली येथे दर तीन दिवसांनी पाणीपुरवठा व घंटा गाडी नियमित - नगरसेवक भास्कर दानवे




**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भारतीय जनता पार्टीचे पाचही नगरसेवक भरघोष मतांनी निवडून आल्याबद्दल संभाजीनगर पाटील गल्ली येथे पाटील गल्ली मित्र मंडळाच्या वतीने भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीत व उत्साही वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमात नवनिर्वाचित नगरसेवक भास्कर दानवे, सौ. सुशिला भास्करराव दानवे, सौ. पद्मा अजित मानधानी, सौ. ज्योती रवि साले व कल्याण जगदीश भदनेकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी नगरसेवक भास्कर दानवे यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना सांगितले की, पाटील गल्ली परिसरातील प्रलंबित व आवश्यक विकासक ामे येणाऱ्या काळात प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील. तसेच नागरिकांच्या दैनंदिन गरजांचा विचार करता, इथून पुढे गल्लीमध्ये दर तीन दिवसांनी नियमित पाणीपुरवठा करण्यात येईल व घंटा गाडी सेवा देखील नियमितपणे सुरू राहील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सत्कार सोहळ्यास भरत पाचफुले, पान २ वर

## मराठी साहित्य संमेलन २०२६ करीता जिल्ह्यातील साहित्य क्षेत्रातील शासकीय महिला अधिकारी यांना नांवे कळविण्याचे आवाहन

### पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

**जालना । प्रतिनिधी -** महाराणी ताराराणी यांच्या ३५१ व्या जयंतीवर्षानिमित्त त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी विविध विभागांमध्ये कार्यरत असलेल्या तसेच सेवानिवृत्त झालेल्या महिला शासकीय अधिकाऱ्यांचे पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सरहद संस्था पुणे यांच्या वतीने व महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने दि. ७ व ८ मार्च, २०२६ रोजी नवी दिल्ली येथे पहिले महिला शासकीय अधिकारी यांचे पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २०२६ आयोजित करण्यात येत आहे.

त्यानुसार जालना जिल्ह्यातील साहित्य क्षेत्रामध्ये योगदान दिलेल्या प्रतिभाशाली शासकीय महिला अधिकारी यांनी त्यांची नावे संमेलनाचे प्रतिनिधी श्री. लेशपाल जवळगे मो. ८४८४०५५२५२ यांना कळवावी असे अवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य) नम्रता चाटे यांनी केले आहे.

## हतनूर जिल्हा परिषद गटात भाजपचा प्रचार रणसंग्राम

### आमदार बबनराव लोणीकर मैदानात घेतल्या चार जोरदार सभा



**हतनूर । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील हतनूर जिल्हा परिषद सर्कल गटाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीकडून प्रचाराला वेग आला असून, सोमवार दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी माजी मंत्री व भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, परतूरमंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी हतनूर जिल्हा परिषद गटात विविध ठिकाणी चार प्रचार सभा घेऊन मतदारांशी थेट संवाद साधला.

या निवडणुकीत जिल्हा परिषद हतनूर सर्कल गटासाठी श्रीमती सौ. मिनाक्षीताई किशोर पवार, पंचायत समिती चापानेर गणासाठी श्रीमती मंदाताई राजीव बोलधने, तर पंचायत समिती हतनूर गणासाठी श्री. संतोष साहेबराव करवंदे हे उमेदवार भारतीय जनता पार्टीकडून अधिकृतरीत्या निवडणूक रिंगणात उतरले आहेत. हे तिन्ही उमेदवार भाजपचे अधिकृत उमेदवार असून त्यांची निवडणूक निशाणी कमळ आहे.

प्रचार सभांदरम्यान आमदार बबनराव लोणीकर यांनी भारतीय जनता पार्टीची भूमिका, विचारधारा आणि विकासात्मक राजकारण यावर सविस्तर मार्गदर्शन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या बारा वर्षांत केंद्रातील भाजप सरकारने देशभरात राबविलेल्या ऐतिहासिक विकास कामांची माहिती त्यांनी मतदारांसमोर मांडली. रस्ते, महामार्ग, रेल्वे, जलजीवन मिशन, घरकुल योजना, शेतकरी सन्मान निधी, उज्ज्वला गॅस योजना, आयुष्मान भारत आरोग्य योजना अशा विविध योजनांमुळे सर्वसामान्यांच्या जीवनात झालेला बदल त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केला.

तसेच केंद्र सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्रातही भाजप पुरस्कृत सरकारने राबविलेल्या शेकडो कल्याणकारी योजना, शेतकरी, महिला, युवक, कष्टकरी, आदिवासी व समाजातील दुर्बल घटकांसाठी घेतलेले निर्णय यांची माहिती आमदार लोणीकर यांनी दिली. विकास, पारदर्शक प्रशासन आणि पान २ वर

## बातमी संदर्भात माहिती घेत असतांना गुत्तेदाराची शिवीगाळ, धक्काबुक्की व जीवे मारण्याची धमकी

### पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेवर थेट हल्ला झाल्याची धक्कादायक घटना आज जालना जिल्हा परिषद कार्यालयात घडली. बातमीच्या अनुषंगाने माहिती घेत असताना एका गुत्तेदाराने पत्रकारास अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे जिल्ह्यातील पत्रकारांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून, पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत संबंधितावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

आज सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ ते १.३० वाजेच्या सुमारास दैनिक जनश्वासचे संपादक भरत गणपतराव मानकर हे जिल्हा परिषद बांधकाम विभागातील सहाय्यक लेखाधिकारी श्री. हारुण यांच्या कॅबिनमध्ये एका बातमीच्या संदर्भात माहिती घेत बसले होते. त्यावेळी श्री. बांगड नावाचा गुत्तेदार अचानक तेथे आला.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, संबंधित गुत्तेदाराने अत्यंत गलिच्छ, अश्लील व अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत, ‘‘कोण मादर.. पत्रकार आहे हा आमचे बिल रोखण्याचा प्रयत्न करतो त्याचे हातपाय तोडून टाकू याला लय मस्ती आली आहे’’ अशा धमकीवजा शब्दांचा वापर केला. इतकेच नव्हे तर पत्रकार मानकर यांना प्रत्यक्ष धक्काबुक्की करत कार्यालयातून हाकलून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे कार्यालयातील कर्मचारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

**बातमी छापून येण्याचा राग की भ्रष्टाचार उघड होण्याची भीती?**

या घटनेमागे केवळ वैयक्तिक राग नसून, बांधकाम विभागातील कामांच्या चौकशीची भीती असल्याची चर्चा आहे. पत्रकार मानकर हे संबंधित गुत्तेदाराच्या कामांबाबत माहिती घेत होते, त्यामुळे संभाव्य अनियमितता उघडकीस येण्याच्या भीतीनेच ही धक्काबुक्की व जीवे मारण्याची धमकी करण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे. यासोबतच, पत्रकार कार्यालयात आल्याची तसेच कोणत्या कामाबाबत चौकशी करत आहेत, याची माहिती गुत्तेदारास नेमकी कोणत्या कर्मचारी अथवा अधिकाऱ्याने दिली, याची सखोल चौकशी होणे अत्यावश्यक असल्याची मागणी करण्यात येत आहे.

**पत्रकार संरक्षण कायद्याची गरज अधोरेखित**

महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदा अस्तित्वात असतानाही अशा प्रकारच्या घटना घडत असतील तर हा कायदा केवळ कागदावरच आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. पत्रकारावर हल्ला करणे म्हणजे थेट लोकशाहीवर हल्ला असल्याचे मत ज्येष्ठ पत्रकारांनी व्यक्त केले आहे. पत्रकार मानकर यांनी कदीम जालना पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करत, गुत्तेदार श्री. बांगड यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करावा, त्यांच्यापासून स्वतःस व दैनिकाच्या प्रतिनिधींना संरक्षण द्यावे, माहिती लीक करणाऱ्या कर्मचाऱ्याची चौकशी करून त्याच्यावरही कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

**पत्रकार संघटनांचा इशारा**

या घटनेनंतर जालना जिल्ह्यातील पत्रकार संघटना आक्रमक झाल्या असून, तात्काळ कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी दिला आहे. ‘‘आज एका पत्रकारावर हल्ला झाला आहे, उद्या हा धोका प्रत्येकावर येऊ शकतो,’’ त्यामुळे पत्रकारांनी संघटीत होऊन कारवाई करण्यासाठी एकजूट दाखववावी.

**प्रशासनाची कसोटी**

ही घटना केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून, भ्रष्टाचारविरोधी लढ्याशी निगडित आहे. प्रशासनाने या प्रकरणात किती गांभीर्याने दखल घेतली, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. जर अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर वेळीच कारवाई झाली नाही, तर पत्रकार निर्भयपणे काम कसे करणार? असा प्रश्न उपस्थित होत असून, तात्काळ कठोर कारवाई हीच लोकशाहीच्या संरक्षणाची हमी ठरेल.

संपादकीय पान

# आद्य क्रांतिकारक

१८५७ साली झालेला उठाव हा भारतीय इतिहासातील इंग्रजांविरोधात झालेला पहिला उठाव आहे असे मानले जाते मात्र त्या अगोदरही इंग्रजांना भारतातून हाकलून देण्यासाठी अनेक छोटेमोठे उठाव झाले मात्र त्यातील काही उठावांची नोंद इतिहासात घेण्यात आली तर काही काही उठावांची नोंदच झाली नाही. अशाच एका उठावाचे जनक ज्यांनी इंग्रजांना सलग १४ वर्ष पळता भुई केली त्या आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची आज पुण्यतिथी मात्र आज त्यांची पुण्यतिथी आहे हे किती लोकांना माहीत आहे हा संशोधनाचा विषय आहे. कित्येकांना हे नाही माहितही कारण ते ज्या समाजात जन्मले तो रामोशी बेडर समाज आजही उपेक्षितच आहे त्यामुळे इतका मोठा क्रांतिकारक भारताच्या इतिहासात होऊन गेला हे आजही अनेकांना माहीत नाही. आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिवडी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव दादोजी खोमणे होते. त्यांचे कुटुंबीय पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत असे म्हणून त्यांना नाईक ही पदवी मिळाली पुढे ते नाईक याच नावानेच ओळखले जाऊ लागले. लहानपणापासून काटक, चंचल आणि शूर असणारे निधड्या छातीचे उमाजी नाईक यांना गुलामगिरीची चीड होते. १८३० साली इंग्रजांनी पुण्यात दुसऱ्या बाजीरावास स्थानापन्न केले तेंव्हा त्याने पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी रामोशी बेडर समाजाकडून काढून घेतली आणि स्वतःच्या मर्जीतील लोकांना ती जबाबदारी दिली त्यामुळे साहजिकच रामोशी समाज खवळला त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली जबाबदारी अशी अचानक काढून घेतल्याने उमाजी नाईक कमालीचे संतप्त झाले शिवरायांपासूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी आपल्या काही साथीदारांसह इंग्रजांना भारतातून हाकलून देण्याची शपथ घेतली. उमाजी नाईक समाजातील गोरगरिबांना आर्थिक मदत करत त्यासाठी ते इंग्रज, सावकार आणि मोठ्या वतनदारांना लुटत. जर कोणी माता भगिनींवर अन्याय करत असत तर ते भावाप्रमाणे धावून जात असत. या दरम्यान त्यांना एकदा अटक झाली त्यांना एका वर्षाची शिक्षा झाली. या एका वर्षात ते तुरुंगातच लिहायला शिकले. एका वर्षाची शिक्षा भोगून आल्यावर त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून त्यांनी इंग्रजांविरुद्ध लपून छपून लढाया केल्या. उमाजी नाईक यांच्या या गनिमीकाव्याने इंग्रज मेटाकुटीला आले. इंग्रज अधिकारी उमजींना पकडण्यासाठी जंग जंग पछाडत होते मात्र उमाजी त्यांच्या हातावर तुरी देत होते. एकदा इंग्रज आणि उमाजींचे सैन्य समोरासमोर आले तेंव्हा उमाजींच्या सैन्याने इंग्रजांच्या सैन्याचा पराभव केला. या लढाईत उमाजींनी पाच इंग्रजांची मुंडकी उडवली त्यामुळे इंग्रज अधिकच भयभीत झाले. त्यांच्या मनात उमाजींची भीती बसली. १८२४ ला उमाजींनी भाबुर्डी येथील इंग्रजांचा खजिना लुटून देवळाच्या देखभालीसाठी लोकांना वाटला. २१ डिसेंबर १८३० ला उमाजींनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्याला मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवून पळवून लावले. त्यांच्या या बंडाला जनतेतूनही मोठा प्रतिसाद मिळत होता. उमाजी नाईक यांनी इंग्रजांविरुद्ध एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्यात त्यांनी नमूद केले होते की लोकांनी इंग्रजांच्या नोकऱ्या सोडाव्यात. इंग्रजांविरुद्ध सर्वांनी एकत्र यावे. इंग्रज सरकार विरोधात अराजकता माजवावी. इंग्रजांचा खजिना लुटून तो गोरगरिबांना वाटावा. इंग्रजांशी असहकार पुकारवा. त्यांना शेतसारा, पट्टी देऊ नये. त्यांच्या या जाहिरनाम्याचे पालन सर्वसामान्य जनता करू लागल्याने इंग्रज आणखी बिथरले. त्यांनी उमाजींना पकडण्यासाठी आता फोडा आणि झोडा नीती अवलंबली. उमाजींची माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये आणि चारशे बिघा जमीन मिळेल असे बक्षिस ठेवले. इंग्रजांची ही नीती कामी आली. एका महिलेचे अपहरण केले म्हणून काळोजी नाईक याचे हात उमाजींनी कलम केले होते तो इंग्रजांना जाऊन मिळाला. उमाजींच्या जवळचा नाना चव्हाण हा देखील इंग्रजांना जाऊन मिळाला. या दोघांनी फितुरी करून उमाजींची माहिती इंग्रजांना दिली. १५ डिसेंबर १८३१ रोजी भोर तालुक्यातील उतरेली गावात उमाजींना पकडण्यात आले. उमाजींवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला. ३ फेब्रुवारी १८३२ ला उमाजींना फाशी देण्यात आली. देशासाठी फासावर जाणारा उमाजी हा पहिला क्रांतिकारक ठरला. फासावर चढण्यापूर्वी उमाजींचे शेवटचे शब्द होते शिवाजी महाराज की जय! वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी देशासाठी हसत हसत फासावर चढणारा हा क्रांतिकारक भारताच्या इतिहासातील पहिला क्रांतिकारक ठरला म्हणून त्यांना आद्यक्रांतिकारक असे म्हणतात. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन पुढे अनेक क्रांतिकारक देशात निर्माण झाले मात्र दुर्दैवाने या महान क्रांतिकारकाने केलेली क्रांती आजही खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच आज त्यांच्या पुण्यतिथीदिनी सर्वांनी त्यांच्या कार्याची ओळख नवीन पिढीला करुन द्यावी. आद्यक्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांना पुण्यतिथीनमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## महापौरपदासाठी शिंदेकडून लाडक्या बहिणींना पसंती

**मुंबई -** महापालिका निवडणूक पार पडल्यानंतर आता महापौर निवडीची प्रक्रिया सर्व ठिकाणी सुरू असून ठाणे जिल्ह्यातील महत्त्वाच्या असलेल्या ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगर महापालिकेमध्ये यंदा अनपेक्षित पद्धतीने महिलाराज येणार आहे. महापौरपदासाठी महिला आरक्षण नसतानाही शिवसेनेचे पक्षनेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्षातील लाडक्या बहिणींवर जबाबदारी देत इथे विश्वास दाखवला आहे. ठाण्यातून शर्मिला पिंपळोलकर-गायकवाड, कल्याण डोंबिवलीत हर्षाली थविल चौधरी आणि उल्हासनगर येथे अश्विनी निकम यांची महापौरपदी वर्णी लागणार आहे. त्यामुळे, सत्ता स्थापनेतही लाडक्या बहिणींना प्राधान्य देत एकनाथ शिंदेंनी महिलांचे हात बळकट केले आहेत. राज्यात नुकत्याच झालेल्या विविध निवडणुकांतून लाडक्या बहिणींनी शिवसेनेला भरभरून प्रतिसाद दिला आहे.

सुराज्य अभियानाच्या पाठपुराव्याला यश : एसटीची राज्यभर डीप क्लीनिंग मोहीम !

# ...पण एसटीची 'मृतावस्थेत' असलेली हेल्पलाईन कधी बोलणार ?

## सुराज्य अभियानाचा सवाल

**मुंबई -** हिंदु जनजागृती समितीच्या 'सुराज्य अभियाना'ने एसटी डेपोच्या स्वच्छतेसाठी राज्यभरात केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. या अभियानाची दखल घेत राज्य सरकारने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान सुरू केले; मात्र बसस्थानकाची स्वच्छता नियमितपणे राहण्यासाठी आता डेपो व्यवस्थापकांना दर १५ दिवसांनी स्थानकांचे सखोल स्वच्छता (डीप क्लीनिंग) करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो; मात्र बसस्थानकांचा परिसर चकाचक होत असला, तरी प्रवाशांसाठीची संपर्क यंत्रणा आजही मृतावस्थेत आहे. त्यामुळे १५ दिवसांनी होणाऱ्या डीप क्लीनिंग' मोहिमेत केवळ फरशी न पुसता, राज्यभरातील बंद पडलेली संपर्क यंत्रणा (हेल्पलाईन) चालू करून तिलाही उर्जितावस्था द्यावी, अशी आग्रही मागणी सुराज्य अभियानाने केली आहे.

एसटी प्रशासनाने नुकतेच स्वच्छतेबाबत सकारात्मक पाऊल उचलले आहे; परंतु सुराज्य अभियानाने एका गंभीर विसंगतीकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. अनेक बसस्थानकांवर चौकशी खिडकीवरील फोन उचलले जात नाहीत किंवा ते बंद असतात. प्रवाशांना गाड्यांच्या वेळा, बदल किंवा तक्रारींसाठी संपर्क साधायचा झाल्यास त्यांना कोणताही प्रतिसाद मिळत नाही. राज्यभरातून येत असलेल्या तक्रारींची नोंद घेत सुराज्य अभियानाने पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव आणि अकोला या जिल्ह्यांतील २१ आगार व्यवस्थापकांना निवेदने देऊन ही परवड प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. सुराज्य अभियानाने या संदर्भात पाठवलेल्या ईमेलची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री सचिवालय () आणि एसटी प्रशासनाने राज्यातील ३१ विभागांना तातडीने त्रुटी सुधारण्याचे निर्देश दिले आहेत.



याविषयी भूमिका मांडतांना सुराज्य अभियानाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक श्री. अभिषेक मुरकुटे यांनी म्हटले की, ''प्रशासनाने आमच्या निवेदनाची दखल घेऊन 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक' अभियान सुरू केले, ही स्वागतार्ह बाब आहे; मात्र सक्रीय हेल्पलाईनशिवाय ही मोहीम अपूर्ण आहे. प्रवाशांना जर एसटीशी संपर्कच साधता येत नसेल, तर त्या सौंदर्यीकरणाचा उपयोग काय? त्यामुळे १५ दिवसांनी होणाऱ्या स्वच्छता मोहिमेत 'संपर्क यंत्रणेची चाचपणी' हा नियमच करावा. या 'सेवा लेखापरीक्षणात' ( ) हलगर्जीपणा आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या सेवा पुस्तिकेत 'नकारात्मक नोंद' करण्यात यावी, अशी आमची आग्रही मागणी आहे.''

# सेवलीत वंचित कडून मंत्री गिरीश महाजनांचा जाहीर निषेध

**जालना । प्रतिनिधी -** वंचित बहुजन आघाडी पक्षाच्या वतीने गिरीश महाजन यांच्या विरोधात नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळलेली आहे. सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रचंड रोष पाहायला मिळत असून फुलेशाहूआंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते, संविधानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले असून, अन्याय व दडपशाहीविरोधात आपला तीव्र निषेध नोंदवत आहेत.

प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात भाषणादरम्यान भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव न घेतल्याने मंत्री गिरीश महाजन वादाच्या भोवऱ्यात सापडले. या घटनेचे तीव्र पडसाद उमटत असून, जालना तालुक्यातील सेवली येथे वंचित कडून जोरदार निषेध नोदवण्यात आला. ''गिरीश महाजन यांची मंत्रिमंडळातून तात्काळ हकालपट्टी करा,'' अशी मागणी यावेळी करण्यात आली.

२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमात मंत्री गिरीश महाजन यांनी उपस्थितांना संबोधित केले. मात्र, या संपूर्ण भाषणात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख केला नाही. ही बाब समोर येताच संविधानप्रेमी, दलित संघटना आणि वंचित बहुजन आघाडीमध्ये संतापाची लाट उसळली आहे. महाराष्ट्रात गिरीश महाजन यांचा नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. आज सेवली येथे वंचित कडून गिरीश महाजन यांच्या विरोधात घोषणाबाजी करत त्यांचा निषेध केला .



राज्यघटनेमुळे मिळालेल्या पदावर बसून घटनेच्या शिल्पकाराचे नाव विसरणे हा जाणीवपूर्वक केलेला अवमान असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीकडून करण्यात आला. अशा मानसिकतेच्या मंत्र्याला मंत्रिमंडळात राहण्याचा नैतिक अधिकार नाही, त्यामुळे सरकारने त्यांची हकालपट्टी करावी. तसेच गिरीश महाजन यांनी महाराष्ट्राच्या जनतेची आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांची माफी मागावी. अशी मागणी वंचित बहुजन आघाडी कडून करण्यात येत आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके, जिल्हा सचिव गणेश खरात, दिलीप मगर, गौतम मगर,भगवान मघाडे, बबन खाडे, दत्ता काकडे, शहाजी खाडे प्रसाद सदावर्ते, शत्रूज्ञ कोळी,ईश्वर डोके, अदित्य डोके, सम्यक डोके युवराज तुरेराव, किरण डोके यांच्या सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्व. अजितदादा पवार यांचा अस्थिकलश जालन्यात जनतेच्या दर्शनासाठी

**जालना । प्रतिनिधी -** राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचा अस्थिकलश जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात आज सोमवार रोजी जनतेच्या दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. यावेळी पक्षाच्या पदाधिकारी, विविध पक्षांचे नेते तसेच असंख्य कार्यकर्त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

या प्रसंगी शिवसेनेचे नेते तथा आमदार अर्जुन खोतकर, माजी मंत्री राजेश टोपे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण, माजी आमदार शिवाजीराव चोथे, शहर जिल्हाध्यक्ष शेख मेहमूद यांच्यासह पंडीतराव भुतेकर, धैर्यशील चव्हाण, शकुंतलाताई कदम, बळीराम कडपे, सुधाकर दानवे, रवींद्र तौर, पंकज बोराडे, कैलास मदन, केशव जंजाळ, मंगलताई पाटील, अण्णासाहेब चितेकर, सुरेश सपाटे, वंदना खांडेभराड, मिर्झा अन्वर बेग, प्रा. सोपानराव तेलगड, अरविंद देशमुख, सखाराम मिसाळ, प्रभाकर घेवंदे, संतोष ढेंगळे, रिकंल तायड, वसंत जाधव, ओमप्रकाश चितळकर, शिवराज जाधव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्व. अजितदादा पवार यांच्या आठवणींना उजाळा देत उपस्थितांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव केला. संपूर्ण वातावरण शोकमय झाले होते.



# युवाशक्ती गावाचा विकास करू शकते -प्रा. सुखदेव मांटे

**जालना । प्रतिनिधी -** युवाशक्तीस गावाचा विकास करू शकते. युवकांनी ठरवले तर काहीच अशक्य नाही, असे प्रतिपादन वाणिज्य शास्त्र विभागाचे प्रा.डॉ.सुकदेव मांटे यांनी केले.

जेइएस महाविद्यालय जालनाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मांडवा येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दि. २९ जानेवारी ते४फेब्रुवारी२०२६ दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. चौथ्या दिवशी बौद्धिक सत्रात प्राध्यापक डॉक्टर सुखदेव मांटे शाश्वत विकासामध्ये युवकांची योगदान विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी उपप्राचार्य प्रा.डॉ.महावीर सदावर्ते होते. यावेळी व्यासपीठावर प्रा. आनंद कुलकर्णी , प्रा. मगरे यांची उपस्थिती होती.



यावेळी बोलताना प्रा. डॉ सुखदेव मांटे म्हणाले की गावातील नदी ,नाल्यावर पाणी अडवून गावाचा विकास युवकच करू शकतात ,या पाण्याचा फायदा सिंचनासाठी होऊ शकतो यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते.गावात सधनता येऊ शकते, युवकांनी ठरवले तर त्यांना काही अशक्य नाही, युवकच गावचा विकास करू शकतात. असेही प्रा. मांटे यांनी सांगितले. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य महावीर सदावर्ते म्हणाले की, देशाचा शाश्वत विकास युवाशक्तीस करू शकते. युवकांनी ठरवले पाहिजे प्रत्येक जिल्ह्यात आदर्श गावांची निर्मिती होऊ शकते. युवाशक्ती राष्ट्र घडवू शकते, असेही प्रा.सदावर्ते यांनी सांगितले. यावेळी छत्रपती संभाजी नगर, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेश सरकटे प्रा. किशोर तापडिया प्रा. योगेश लहामाटे आदि उपस्थित होते, या कार्यक्रमचे सूत्रसंचालन दुर्गेश काळे यांनी केले. तर आभार सदाशिव उबाळे यांनी मानले. या कार्यक्रमास मांडवा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

### संभाजीनगर पाटील ...

ॲड. धामणगावकर, राहुल कंटाळे, सचिन कंटाळे, रवी तुरे, प्रदीप गव्हाड, अमित तातेड, गोपाल नन्नवरे, सतीश नाईकवाडे, रोहित माधवले तसेच पाटील गल्ली मित्र मंडळाचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हतनूर जिल्हा ...

लोककल्याण हाच भारतीय जनता पार्टीचा अजेंडा असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले.

हिंदुत्वाची भूमिका, राष्ट्रवाद आणि सांस्कृतिक अस्मिता याविषयी बोलताना आमदार लोणीकर यांनी अयोध्येतील भव्य राम मंदिर उभारणीचा उल्लेख केला. शेकडो वर्षांची प्रतीक्षा संपवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राम मंदिर साकार झाले असून, हा क्षण प्रत्येक हिंदूसाठी अभिमानाचा असल्याचे त्यांनी सांगितले. देशाच्या सुरक्षेपासून ते विकासापर्यंत भाजप सरकारने घेतलेले निर्णायक निर्णय जनतेच्या हिताचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, जिल्हा परिषद हतनूर सर्कल गटाच्या उमेदवार श्रीमती सौ. मिनाक्षीताई किशोर पवार या माजी मंत्री व आमदार बबनराव लोणीकर यांच्या कन्या असून, त्या शिक्षण, सामाजिक कार्य आणि लोकसंपर्काच्या माध्यमातून मतदारांशी सातत्याने जोडल्या गेल्या आहेत. त्यांच्या माध्यमातून हतनूर जिल्हा परिषद गटात विकासाभिमुख, पारदर्शक व लोकाभिमुख नेतृत्व मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या प्रचार सभांना भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक नेते, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण हतनूर जिल्हा परिषद गटात भाजपच्या प्रचाराला उत्साहाचे वातावरण असून, कमळ निशाणीला मोठे पाठबळ मिळत असल्याचे चित्र यावेळी दिसून आले.

# जालना जिल्ह्यातील निम्न दुधना प्रकल्पाच्या अतिरिक्त जमिनीवरील सोलार प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध

## जालना येथील पाटबंधारे विभागात शेतकऱ्यांची बैठक

जालना प्रतिनिधी - आज दिनांक २७ मंगळवार रोजी दुपारी दोन वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना जिल्ह्यातल्या निम्न दुधना प्रकल्पावरील सोलार प्रकल्पाला शेतकर्यांनी विरोध केलाय. निम्न दुधना प्रकल्पासाठी शेतकर्यांनी जमिनी दिल्या. मात्र यात पाणी साठवण्यासाठी घेतलेल्या जमिनीवर शासनाचा सोलार प्रकल्प उभारण्याचं प्रस्तावीत आहे. तब्बल एक हजार एकर वरील अतिरिक्त जमिनीवर सोलार प्रकल्प उभारण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे. मात्र शासनाने सौर उर्जा प्रकल्पाचा घाट थांबवावा आणि शेतकर्यांना जमिनी परत करा. या मागणीसाठी जालना पाटबंधारे विभाग येथे शेतकर्यांची मुख्यअधिक्षक अभियंता यांच्यासोबत बैठक झाली असून सौर प्रकल्पाला विरोध करत शेतकर्यांनी शासनाचा निषेध व्यक्त केलाय. यावेळी मुख्यअधिक्षक अभियंता यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की मंठा तालुक्यातील विविध गावांमध्ये सिंचन प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेली जमीन नियोजित उद्देशासाठी वापरण्यात न आल्याने सदर जमीन मूळ शेतकरी मालकांना परत देण्यात यावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटना, मंठा तालुका यांच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात जलसंपदा विभाग, जालना येथील कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पाणी साठवणुकीसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा उद्देश बदलून त्या ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहे. मात्र, सौर प्रकल्पासाठी जमीन संपादन करताना शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त दराने अथवा मूळ जमीन मालकांच्या संमतीने जमीन खरेदी करण्यात यावी, असे शासन निर्णय असतानाही त्याचे पालन करण्यात आलेले नाही. तसेच, संबंधित जमिनीचे सातबारे अद्याप शेतकऱ्यांच्या नावावर असताना त्या जमिनीवर इतर प्रयोजनासाठी काम सुरू असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकरणी तातडीने निर्णय घेऊन अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे. या बैठकीला गणेश राजबिंडे, परतूर तालुका अध्यक्ष, सतिष निर्वळ मंठा तालुका अध्यक्ष, शिवाजी महाराज भोसले, बाळाभाऊ बिडवे, नामदेव खोसे, वैभव मानवतकर, अंशिराम कबाडी, कल्याणराव लाटे, नवल सोनी यांच्यासह शेतकरी बऱ्या सेने उपस्थिती होती

# विरोधकांचे आरोप निराधार

## जिल्हा संघटनेचे कामकाज नियमाप्रमाणेच अध्यक्ष साईनाथ पवार व सचिव जितेंद्र लखोटिया यांचा खुलासा

**जालना । प्रतिनिधी -** औषधी संघटनेचे माजी अध्यक्ष प्रमोद तोतला यांनी केलेल्या आरोपांना जालना जिल्हा रिटेल अँड होलसेल केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष साईनाथ पवार आणि सचिव जितेंद्र लखोटिया यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सडेतोड उत्तर दिले आहे.



विरोधक पराभूत मानसिकतेतून बिनबुडाचे आरोप करत असून संघटनेचे सर्व कामकाज नियमानुसारच चालत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

नेमके प्रकरण काय?

नुकत्याच झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर साईनाथ पवार यांनी भूमिका स्पष्ट केली की, ''केमिस्ट कल्चरल हॉल हडपण्याचा माझा कोणताही उद्देश नाही. मी या नवीन संकल्पनेतून घाऊक औषधी व्यवसाय सुरू करणार होतो. त्यासाठी दवा बाजारमध्ये एक दुकान भाड्याने घेऊन फर्निचरचे कामही सुरू केले होते. याच दुकानाच्या उद्घाटनाचे निमंत्रण देण्यासाठी मी आदरणीय जगन्नाथ अण्णा शिंदे यांच्याकडे गेलो असता, त्यांनी मला हॉलमध्ये व्यवसाय सुरू करण्याचा सल्ला दिला होता.''

पवार पुढे म्हणाले की, ''अण्णांनी मला सुचवले होते की, मी इतरत्र जे ५० हजार रुपये भाडे देणार आहे, तेच भाडे हॉलला दिल्यास संघटनेला उत्पन्न मिळेल. मात्र, तोतला यांनी या चांगल्या कामात नेहमीप्रमाणे अडथळा आणला आणि सभासदांमध्ये संभ्रम निर्माण केला. त्यामुळे मी तो निर्णय बदलून दुकान दुसऱ्या ठिकाणी सुरू केले आहे.''

निवडणुकीतील पराभवाचा वचपा?

यावेळी सचिव जितेंद्र लखोटिया यांनी विरोधकांवर निशाणा साधला. २०२३ च्या निवडणुकीत सभासदांनी पवार यांच्या पॅनेलला प्रचंड बहुमताने निवडून दिले आहे. जालना तालुका वगळता संपूर्ण जिल्ह्यात विरोधकांचा एकही उमेदवार विजयी होऊ शकला नाही. याच पराभवाच्या मानसिकतेतून हे आरोप केले जात असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

कामकाजात पारदर्शकता

संघटनेच्या वतीने सांगण्यात आले की:

दर तीन महिन्यांनी कार्यकारिणी सभा घेऊन सर्व निर्णयांना व खर्चाला मंजुरी घेतली जाते.

फार्मसी कौन्सिलच्या शिबिरांद्वारे सभासदांना प्रशिक्षित केले जाते.

दिवाळी संमेलन, रक्तदान शिबिर आणि पूरग्रस्तांना मदत असे सामाजिक उपक्रम राबवले जातात.

तोतला यांनी केलेल्या उपोषणाला २२०० सभासदांपैकी केवळ १०-१५ सभासदांचाच पाठिंबा होता, हे त्यांच्या अल्प प्रतिसादावरून स्पष्ट होते.

''सभासदांच्या मनात कोणताही संभ्रम राहू नये, यासाठीच आम्ही हा खुलासा करत आहोत,'' असे साईनाथ पवार आणि जितेंद्र लखोटिया यांनी पत्राच्या शेवटी नमूद केले आहे.

# गुरू रोहिदास महाराज व भगवान विश्वकर्मा यांची जयंती उत्साहात साजरी



**हसनाबाद । प्रतिनिधी-** हसनाबाद जवळच असलेल्या लतिफपुर येथे भगवान विश्वकर्मा व राष्ट्रसंत संतशिरोमणी गुरू रोहिदास महाराज यांच्या जयंती निमित्ताने लतीफपुर गावात भगवी रॅली काढण्यात आली.त्यानंतर संतशिरोमणी गुरू रोहिदास महाराज,भगवान विश्वकर्मा व हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून हरि भक्त परायण अरुण महाराज पिंपळे यांचे व्याख्यान व शिवव्याख्याते हभप ज्ञानेश्वर माऊली फुके यांचे शिवचरित्रावर व्याख्यान झाले.यावेळी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.संतशिरोमणी गुरू रोहिदास महाराजांचे जीवन एका खडतर व कठीण काळात रोहिदास महाराजांचा जन्म झाला.एका गरीब व चर्मकार समाजात जन्मल्यामुळे रोहिदास महाराजांना समाजातील समाजकंटक लोक हिणवत असे व निंदा करत आसत,महाराजांच्या पदस्पर्शाने गंगा देखील अपवित्र होते असे म्हणून त्यांना अतोनात छळ करत होते.त्रास देण्याचे काम या धर्म मार्तंडांनी केलेलं होते,समाजातील विदारक परिस्थितीबाबत देखील प्रबोधनकार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.हभप ज्ञानेश्वर महाराज फुके यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची जीवन चरित्र व इतिहास आपल्या वाणीतून व्यक्त केला तसेच भोकरदन तालुका अध्यक्ष शिवाजीराव शिंगारे यांनी देखील राजुर प्रखंडात हर घर भगवा हे अभियान राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव ते छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव १९ फेब्रुवारी पर्यंत राबवण्याचा निर्धार केला व प्रत्येक हिंदू बांधवांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीदिनी आपल्या घरावर भगवा ध्वज फडकवून छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करावी, असे आव्हान केले.आपला महाराष्ट्र हा साधु,संत,महंत यांचा थोर महाराष्ट्र आहेत,या महाराष्ट्राला एक राष्ट्र म्हणून देखील एक वेगळी ओळख आहेत,येथील डोंगर,दरी,नदी-नाले,सागर तसेच रंग,रूप,वेष,भाषा यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

या प्रबोधनपर व्याख्यान प्रसंगी बजरंग दलाचे जालना जिल्हा प्रचारक नामदेवराव बोराडे,ज्ञानेश्वर पाटील फुके, विष्णू पाटील जाधव युवा जिल्हाध्यक्ष छत्रपती शिवराय प्रतिष्ठान जालना,दत्तू पाटील जाधव प्रसिद्धीप्रमुख छत्रपती शिवराय प्रतिष्ठान जालना,भगवान भाऊ जीवरग टाकळी,किशोर पाटील मोहिते गोषेगाव,योगेश पाटील मोहिते,शिवनाथ भाऊ सोरमारे,हरिभाऊ मोरे,संतोष पाटील मोरे,सुखदेव पाटील मोरे यांच्या सह पंचक्रोशीतील तमाम शिवभक्त व हिंदू समाज या प्रसंगी उपस्थित होता.संतोष पाटील मोरे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## शहागड येथे भगवान विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी

# विश्वकर्मा को-ऑप क्रेडिट सोसायटीत पूजन कार्यक्रम

**अंबड । प्रतिनिधी -** अंबड तालुक्यातील शहागड येथील विश्वकर्मा को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. येथे सृष्टीचे निर्माते भगवान विश्वकर्मा यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली. यावेळी भगवान विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन डॉ. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास विश्वकर्मा को-ऑप क्रेडिट सोसायटीचे सचिव धर्मराज हारेर यांच्यासह माऊली उदावंत, सचिन शहाणे, गणेश जाधव, माऊली मापारी, अंगत खिल्लारे, महादेव सोलनकर, कांता टाकसाळ, राम धौत्रे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी भगवान विश्वकर्मा यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी सामाजिक एकतेचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता केली.




### जालना रोटरी क्लबच्या हॅपी स्कूल उपक्रमाने कॅनडाचे पाहुणे भारावले

# नाजीक पांगरी जिल्हा परिषद शाळेचा कायापालट पाहून व्यक्त केला आनंद






**जालना । प्रतिनिधी -** रोटरी फ्रेंडशिप एक्सचेंज अंतर्गत जालन्यात आलेल्या कॅनडा येथील रोटरी प्रतिनिधी मंडळाने नुकतीच बदनापूर तालुक्यातील नजीक पांगरी येथील जिल्हा परिषद शाळेला भेट दिली. यावेळी शाळेचा शैक्षणिक दर्जा, डिजिटल क्रांती आणि विद्यार्थ्यांच्या कल्पकतेने पाहुणे भारावून गेले. रोटरी क्लब ऑफ जालना, विनोदराय इंजिनियर्स आणि जिल्हा परिषद यांच्या संयुक्त प्रयत्नातून साकारलेल्या या हॅपी स्कूल उपक्रमाचे या टीमने विशेष कौतुक केले.

शाळेत आगमन होताच मुख्याध्यापक डॉ. शिवाजी उगले, शालेय कर्मचारी, विद्यार्थी आणि जिल्हा परिषद सदस्यांच्यावतीने कॅनडाच्या टीमचा पारंपारिक पद्धतीने सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या पोषण आहारासाठी विकसित केलेल्या व्हेजिटेबल गार्डनची (परसबाग) पाहुण्यांनी पाहणी केली. तुषार सिंचन सुविधेसह असलेल्या या बागेतील भाजीपाल्याचा वापर विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहार खिचडीमध्ये केला जातो, जेणेकरून विद्यार्थ्यांना सकस आहार मिळेल. या नाविन्यपूर्ण उपक्रमाची पाहुण्यांनी प्रशंसा केली. यासोबतच शाळेतील गुलाब बाग, वृक्षारोपण, आकर्षक रंगकाम, स्वच्छ शौचालय व हँडवॉश स्टेशनची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही ग्रामीण शाळा शहरांच्या तुलनेत मागे नाहीत, हे पाहून पाहुणे थक्क झाले. रोटरीच्या माध्यमातून विनोदराय इंजिनिअरिंगतर्फे भेट देण्यात आलेल्या संगणकांवर विद्यार्थी स्क्रॅच सॉफ्टवेअरच्या मदतीने ॲनिमेशन करत आहेत. काही विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले ॲनिमेशन पाहुण्यांना दाखवले. मुख्याध्यापक डॉ. शिवाजी उगले यांचे टीमवर्क, नाविन्यपूर्ण संकल्पना, रोटरी अध्यक्ष सौ. वर्षा पित्ती, ज्येष्ठ रोटरियन सुनील रायठठ्ठा, सुरेश मगरे आणि रोटरी टीममुळे हे शक्य झाले आहे. ज्याचे कॅनेडियन टीमने भरभरून कौतुक केले. यावेळी रोटरी क्लब ऑफ जालनाचे साक्षरता संचालक रमेश मगरे यांनी हॅपी स्कूल संकल्पनेची सविस्तर माहिती दिली. या शाळेला हॅपी स्कूल बनवण्यासाठी करण्यात आलेले बदल आणि भविष्यातील योजनांबाबत त्यांनी पाहुण्यांशी संवाद साधला. येथील शिक्षण पद्धती, विशेषतः मुलींच्या शिक्षणाला दिलेले महत्त्व आणि तंत्रज्ञानाचा वापर वाखाणण्याजोगा आहे, अशा प्रतिक्रिया कॅनडाच्या टीमने नोंदविल्या.

या प्रसंगी ज्येष्ठ रोटरियन प्रमोद झांझरी, सुरेश मगरे, प्रशांत महाजन, रमेश मगरे यांच्यासह शाळेचे शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## डॉ. शेख ताहा यांचे एफएमजीई वैद्यकीय परीक्षेत दैदीप्यमान यश

### पोलीस प्रशिक्षण केंद्रात सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** जिद्द, चिकाटी आणि कष्टाच्या जोरावर नॅशनलनगर येथील रहिवासी आणि पोलीस विभागातील लिपिक (सेवानिवृत्त फौजी) शेख एजाज अजीम यांचे चिरंजीव डॉ. शेख ताहा यांनी परदेशातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर, अत्यंत कठीण मानली जाणारी एफएमजीई
परीक्षा ३०० पैकी १९० गुण मिळवून



यशस्वीपणे उत्तीर्ण केली असून, जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

परदेशातून एमबीबीएस ही वैद्यकीय पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठीची पात्रता परीक्षा भारतामध्ये डॉक्टर म्हणून नोंदणी मिळवण्यासह प्रॅक्टिससाठी आवश्यक असते. डॉ. शेख ताहा यांच्या या यशाबद्दल पोलीस प्रशिक्षण केंद्रात केंद्राचे प्राचार्य अशोक बनकर, उपप्राचार्य विलास पाटील यांच्या हस्ते सत्कार पुष्पगुच्छ आणि शाल देऊन गौरव करण्यात आला.

याप्रसंगी आपल्या मुलाच्या यशाचे कौतुक पाहून डॉ. ताहा यांचे वडील शेख एजाज आणि आई अमिना बेगम यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले होते. यावेळी अशोक बनकर आणि विलास पाटील यांनी डॉ. ताहा यांना भावी वाटचालीस शुभेच्छा देताना, हा केवळ शेख कुटुंबाचा नाही, तर संपूर्ण जालना जिल्ह्याचा अभिमान आहे, अशा भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाला शेख कुटुंबातील सदस्य, मित्रपरिवार आणि नॅशनलनगरमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनीच डॉ. ताहा यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. एका सामान्य कुटुंबातून येऊन, देशपातळीवरील परीक्षेत यश मिळवून डॉ. ताहा यांनी समाजासमोर एक नवीन आदर्श उभा केला आहे.

## सात दिवसीय मोफत निवासी मधुमक्षिका पालन प्रशिक्षण

**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कृषि विज्ञान केंद्रामार्फत मोफत सात दिवसीय निवासी 'मधुमक्षिका पालन प्रशिक्षण शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय मधुमक्षिका पालन व मध अभियान अंतर्गत हे शिबीर दिनानक ११ ते १७ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत होईल. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या प्रशिक्षण शिबिरासाठी मर्यादित प्रवेश क्षमता आहे. इच्छुक शेतकरी, युवक युवतींना या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घ्यावा. अधिक माहिती आणि नाव नोंदणीसाठी श्री. ऋषिकेश पवार यांच्याशी भ्रमणध्वनीवर (७३८५ २७२ ४०९) संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाच्या कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. नितीन ठोके यांनी केले आहे.

## कंत्राटी कामगारांना नियमित नोकरीत प्राधान्य

### सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय - ॲड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -**'सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे कंत्राटी कामगारांच्या हक्कांसाठी मिळालेला एक मोठा विजय आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अनिश्चिततेला आणि शोषणाला या निकालामुळे आळा बसेल. मालक आता कामगारांना नियमित सेवेच्या फायद्यांपासून वंचित ठेवण्यासाठी कंत्राटी पद्धतीचा गैरवापर करू शकणार नाहीत. या निर्णयामुळे कामगार आणि मालक यांच्यातील संबंधात अधिक पारदर्शकता येईल आणि कामगारांना त्यांचे हक्क मिळण्यास मदत होईल. आम्ही या निर्णयाचे स्वागत करतो आणि त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत.''

सर्वोच्च न्यायालयाने एका ऐतिहासिक निकालात असे म्हटले आहे की, जेव्हा एखादा मालक कंत्राटी कामगारांच्या जागी नियमित कामगारांची नियुक्ती करण्याचा विचार करतो, तेव्हा त्याला पूर्वीच्या कंत्राटी कामगारांना प्रथम प्राधान्य द्यावे लागेल. न्यायमूर्ती पंकज मिथल आणि न्यायमूर्ती एसव्हीएन भट्टी यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला, ज्यामुळे देशभरातील लाखो कंत्राटी कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, मालक पूर्वीच्या कंत्राटी कामगारांकडे दुर्लक्ष करून थेट खुल्या बाजारातून नवीन उमेदवारांची भरती करू शकत नाही.

न्यायालयाने आपल्या निकालात नमूद केले आहे की, कंत्राटी कामगारांना प्राधान्य देताना मालकाने काही नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. यामध्ये कमाल वयोमर्यादा आणि शैक्षणिक पात्रतेमध्ये सूट देण्याचा विचार केला पाहिजे, विशेषतः जेव्हा पदे तांत्रिक स्वरूपाची नसतील. यामुळे अनुभवी कामगारांना नियमित नोकरी मिळण्याची संधी मिळेल आणि त्यांचे कौशल्य वाया जाणार नाही. हा निर्णय कामगारांच्या हिताचे रक्षण करणारा असून, त्यांना नोकरीमध्ये स्थिरता आणि सुरक्षितता प्रदान करणारा आहे, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

याचबरोबर, न्यायालयाने अशा प्रकरणांवरही भाष्य केले जिथे कंत्राटी पद्धत केवळ एक देखावा असतो आणि खरा मालक-कर्मचारी संबंध लपवण्यासाठी तिचा वापर केला जातो. अशा प्रकरणांमध्ये, जर हे सिद्ध झाले की मालकाचे कामगारांवर पूर्ण नियंत्रण आणि देखरेख होती, तर ते कंत्राट बनावट मानले जाईल. अशा स्थितीत, कामगारांना थेट मुख्य मालकाचे कर्मचारी मानले जाईल आणि त्यांना सेवेत नियमित करण्याचे निर्देश दिले जातील. इतकेच नव्हे तर, त्यांना सुरुवातीपासून किंवा न्यायाधिकरणाने निश्चित केलेल्या तारखेपासून नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व थकबाकी आणि इतर लाभ मिळतील.

सदर प्रकरण औद्योगिक विवाद कायद्याच्या कलम ३३(१) अंतर्गत औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशाविरोधात व्यवस्थापनाने दाखल केलेल्या अपिलावर आधारित होते. सर्वोच्च न्यायालयाने औद्योगिक न्यायालय आणि उच्च न्यायालयाचे अंतरिम आदेश बाजूला ठेवले, परंतु कामगारांना पुन्हा औद्योगिक न्यायालयात दाद मागण्याची मुभा दिली आहे. स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड आणि इतर विरुद्ध नॅशनल युनियन वॉटरफ्रंट वर्कर्स आणि इतर, (२००१) ७ एससीसी १, या घटनापीठाच्या निकालाच्या चौकटीनुसार कामगार कंत्राटाला बनावट म्हणून आव्हान देऊ शकतात आणि नियमित भरतीमध्ये प्राधान्य मिळवण्यासाठी योग्य दिलासा मागू शकतात.

---

## कुठलेही दडपण न टाकता मुलांना हसत खेळत शिकू द्या- केदार कुलकर्णी

### महात्मा फुले इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**अंबड । प्रतिनिधी -** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक स्नेह संमेलनासारखे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम उपयुक्त ठरतात.तसेच पुस्तकी अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी विविध कला,छंद जोपासावेत असे आवाहन करतांनाच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कौतुकास्पद काम महात्मा फुले इंग्लिश स्कुल नेहमीच करत असते.पालकांनी दडपण न आणता मुलांना हसत खेळत शिकू द्यावे असे मत अंबडचे नगरसेवक केदार दादा कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

अंबड शहरातील महात्मा फुले व स्मार्ट किडस वर्ड इंग्लिश स्कुलच्या शनिवारी आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाटन नगरसेवक केदार दादा कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून एसबीआय बँकेचे शाखाधिकारी कैशीक चौधरी,भाजपा जेष्ठ नेते डॉ.राजेंद्र ठोसर,माजी नगरसेवक कुमार रुपवते,नगरसेवक गंगाधर वराडे,नगरसेवक सौरभ कुलकर्णी,केंद्र प्रमुख माने सर ,यशवंत व्याख्यान मालेचे संजय खोरे,संपादक बळीराम राऊत,बाबासाहेब सोळुंके आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना केदार कुलकर्णी म्हणाले की, कोणत्याही मुलाची पहिली शाळा हे त्याचे घर असते आणि पहिले शिक्षक हे त्याचे पालक असतात. सुरुवातीच्या काळात कोणतेही मूल आपल्या पालकांकडूनच सर्व कामे करायला शिकते, जर तुम्हाला तुमच्या मुलाचे भविष्य चांगले घडवायचे असेल तर त्यांना नेहमीच चांगले शिक्षण द्या.आजच्या पालकामध्ये शिक्षणाविषयी आवड आहे त्यामुळे प्रत्येक पालक आपल्या मुलांकडून काही तरी आपेक्षा धरुन आहे मात्र




पालकांनी आपल्या मुलांवर जास्त दडपण न टाकता त्यांला मुक्तपणे त्यांच्या मनाप्रामाणे जगू दिले पाहिजे,हे वय मुलांचे खेळण्या बागडण्याचे आहे त्यामुळे मुलांना हसत खेळत शिकू द्या असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी भारतीय स्टेट बँकेचे शाखाधिकारी कैशिक चौधरी व भाजपाचे जेष्ठ नेते डॉ.राजेंद्र ठोसर यांनीही मौलिक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात संस्थाध्यक्ष गिताराम मते यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा मांडला तसेच विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्याचे काम आम्ही असेच प्रामाणिकपणे करत राहू अशी ग्वाही दिली.

यावेळी वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात देवा श्री गणेशा,वारकरी दिंडी,फनी डान्स, देशभक्तीपर गाणे,शेतकरी गित अशी अनेक गाणे विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे सादर केली.यामध्ये तान्हाजी मालुसरे यांची लढाई तसेच देशाच्या एकात्मतेवरील नृत्यकला लक्षवेधी ठरल्या.

या कार्यक्रमांचे सुत्रसंचालन स्वाती जंगले व उज्वल सावंत यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या सविता मते,शबनम शेख,साधना शिंदे,सोनाली जैन,आश्विनी जानवे,गायत्री पाटील,कोमल देवडे,वैष्णवी गायकवाड,वैभवी पडूळ,कोमल ऊगले, यांच्यासह बाबासाहेब जावळे,शिवराज मते,संजय परदेशी आदींनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह विद्यार्थी व पालकांची मोठी उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व.अजीतदादा पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली यावेळी अजीजदादा यांचा आवाजातील वरील ऑडीओ लावण्यात आला होता यावेळी संपुर्ण सभागृह भावूक झाले होते. अनेकांच्या डोळयात पाणी आले.

या कार्यक्रमात अजीजदादा पवार यांची रांगोळी ठरली लक्षवेधी सर्वांचे लक्ष त्या रांगोळीकडेच होते .केशव मिटकुल व प्रसाद जावळे यांनी विमान अपघाताची दादाचा फोटो असलेली रांगोळी काढली होती ही रांगोळ काढण्यासाठी त्यांना तब्बल ५ तास लागले होते.

### पालक नसलेल्या, हलाखीच्या आर्थिक परिस्थितीच्या मुलांना मोफत शिक्षण

कोरोनामध्ये पालक गमावलेल्या मुलांसह आत्महत्याग्रस्त शेतक-यांची मुले तसेच जे पालक मुलांची शैक्षणिक फिस भरु शकत नाही अशा गरीब मुलांना महात्मा फुले इंग्लिश स्कुलमध्ये मोफत प्रवेश देवून त्यांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च संस्था करत असून सद्यस्थितीमध्ये या शाळेत अशी १७ मुले मोफत शिक्षण घेत आहेत असे संस्थाध्यक्ष गीताराम मते यांनी यावेळी सांगितले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.